**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण जिजाबा चव्हाण
मु.पो.बनवडी, दूधगंगा सोसायटी बनवडी कॉलनी,
ता.कराड, जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख,
कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६ / सातारा /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळकृष्ण जिजाबा चव्हाण
मु.पो.बनवडी, दूधगंगा सोसायटी बनवडी कॉलनी,
ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा
श्री.सतीश यादवराव भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कराड
**जि. सातारा** श्री.के.एम.कणसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे कोपर्डे, ता.हवेली येथील वरील गटातील रमदानातून विहिर काढलेली असून ती जागा व विहिरीची नोंद परस्पर दुसऱ्याचे नांवे केली आहे. त्यासाठी भूमापन क्र.१५९० जुना नं.१८५४ चे मोजणीच्या चतु:सीमासह नकला व वाटणीचे क्षेत्र. जमीन एकत्रीकरणाचा गटाचा संपूर्ण नकाशा. गट नं.१७९० चे क्षेत्र व हद्दी कशाप्रकारे आहेत.सदर गटाचे क्षेत्र रस्त्याच्या पलीकडे दाखविले आहे ते बरोबर आहे का? रस्ता कराड-मसूर कोणत्या गटातून जातो त्याची लांबी रुंदी किती आहे. दि.२३.१०.२००३ च्या नकाशाची प्रत जोडली आहे त्याप्रमाणे सविस्तर माहिती व नकाशे मिळावेत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण जिजाबा चव्हाण यांनी आपल्या हिश्श्यामधील जमिनीतील विहिरीची नोंद अन्य व्यक्तीच्या नावे कशी झाली, याची संबंधित गटाच्या एकत्रिकरणाच्या नकाशासह माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कराड, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, सातारा यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल न घेतल्यामुळे श्री.चव्हाण यांनी लोकआयुक्तांकडे अपील केले. त्याच्या कक्षेत हा विषय येत नसल्यामुळे त्यांनी अपील परत पाठविले. त्यानंतर श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सन १९८८ मध्ये आपल्या वाट्याला आलेल्या जमिनीत आपण विहिर बांधली. त्यानंतर आपल्याला कल्पना न देता ती सौ.सुशिला रामचंद्र पाटील यांच्या गटात समाविष्ट केली गेली. आपण करुन घेतलेल्या मोजणीच्या जागेचा नकाशा दिला असून विहिरीचा कबजा व आपले क्षेत्र आपल्याला परत मिळावे अशी मागणी श्री.चव्हाण यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी

केली. सन १९७६ च्या एकत्रीकरण योजनेप्रमाणे गटातील जमिनीचीच नोंद करण्यात आली असून त्यानुसार गट नकाशा तयार झाला, तो श्री.चव्हाण यांना देण्यात आला, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख श्री.के.एम.कणसे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, जिल्हा निरिक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.सतीश यादवराव भोसले यांनी नमूद केले. मात्र आपल्याला वेगवेगळे नकाशे मिळाले असल्याचे प्रतिपादन श्री.चव्हाण यांनी केले. श्री.कणसे व श्री.भोसले यांनी संबंधित नकाशे व अन्य कागदपत्रे यासह गटविभागणीबाबतची परिस्थिती स्पष्ट केली. परंतु भूमी अभिलेखाबाबत आपली तक्रार कायम असल्याचे श्री.चव्हाण यांनी सांगितले. भूमी अभिलेखाबाबत तक्रार असल्यास, तसेच गट नोंदीबाबत दुरुस्ती अपेक्षित असल्यास उपसंचालक, भूमी अभिलेख यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे व तसे आपण श्री.चव्हाण यांना अनेकदा स्पष्ट केलेले आहे, असे श्री.कणसे व श्री.भोसले यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आलेली आहे. मात्र गटातील जमिनीची सन १९७६ च्या एकत्रीकरण योजनेप्रमाणे नोंद व विभागणी कशाप्रकारे केली गेली, अन्य व्यक्तीच्या नावे नोंद कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाली, ही माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. नोंद दुरुस्त करुन घेण्यासंबंधीचा भाग कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. अपीलकर्त्याने त्यासाठी योग्य त्या प्रशासकीय कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला गटातील जमिनीच्या नोंदीबाबतची माहिती द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.५.६.२००८ पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.५.२००८
मे-२००८

7

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे डिसेंबर २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी ताराराणी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. गणपतराव रामचंद्र हितारे<br>रा. आझाद रोड, गट नं.८, जयसिंगपूर<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) पुणे विभाग, पुणे |

वरील तीनही घटकांमधील चर्चानुसार अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्याने अपीलकर्त्याची काहीही तक्रार राहिलेली नाही असे लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २३.५.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी<br>मु.पो. शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | करमणूक कर अधिकारी, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर |

वरील तीनही घटकांत झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झालेली असल्याने अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने संमती दिलेली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. शशिकांत नारायण वसगडेकर<br>अमित् अपार्टमेंट, सांभारे रोड, गावभाग, सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. आपले अपील मोघम स्वरूपाचे असल्याने निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने मान्यता दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप अशोक देसाई — अपीलकर्ता
रा. ए-२२, सरगम अपार्टमेंट, जि.प.कार्यालयासमोर,
नागाळा पार्क, जि. कोल्हापूर

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
देवस्थान व्यवस्थापन समिती,
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव,
देवस्थान व्यवस्थापन समिती,
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २१.३.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १०.४.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १९.४.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१ जानेवारी १९९५ ते ३१ मार्च २००७ पर्यंत कोल्हापूर जिल्ह्यातील खुली जागा जमीन वेगवेगळ्या संस्थांना, ट्रस्ट, व्यक्तींना मोफत किंवा सवलतीच्या दरात, लिजने दिली असेल त्याची माहिती. जमिनीचा सिटी सर्व्हे क्रमांक, क्षेत्र, जागा ज्या संस्थेला किंवा व्यक्तीला दिली त्यांची नावे, पत्ते, ज्या कारणासाठी जागा दिली त्याच कारणासाठी वापर होतो का, याची माहिती | |

# विवेचन

कोल्हापूर जिल्ह्यातील देवस्थान जमिनीचे वाटप व वापर या संदर्भातील सर्व माहिती अपीलकर्ता श्री. दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. मागणी केलेली माहिती संदिग्ध असल्याचे कारण दर्शवून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. त्याविरूध्द श्री. देसाई यांनी सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. सुनावणी व आपली बाजू ऐकून न घेता अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपले अपील निकालात काढले, म्हणून श्री. देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. देसाई यांनी दि. २७.७.२००७ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाला आवश्यक शुल्काचे मुद्रांक लावलेले नव्हते. दि. ४.९.२००७ रोजी २०/- रूपयाचे मुद्रांक शुल्क पाठवून ते अपिलासोबत जोडण्याची विनंती त्यांनी केली. आयोगाने ती मान्य करून त्यांचे अपील दाखल करून घेतले.

आपण मागितलेली माहिती देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र यांच्याकडे आहे. परंतु देवस्थानच्या मालकीची जागा ज्या संस्थांना व नागरिकांना दिली आहे त्याची माहिती मिळाली तर मोठा भ्रष्ट कारभार जनतेसमोर येईल, तो येऊ नये, म्हणून ही माहिती नाकारली जात आहे, असे श्री. देसाई यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. मात्र आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती आपण नोंदणीकृत टपालाने (रजिस्टर्ड पोस्ट) पाठविली होती, परंतु श्री. देसाई यांनी ती स्वीकारली नाही. आपल्याला माहिती टपालाच्या देय दाखल्यानेच (U.P.C.) मिळाली पाहिजे, असा श्री. देसाई यांचा आग्रह आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकाऱ्यांनी पूरक कागदपत्रांसह केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता पुढील बाबी स्पष्ट होतात :

१. श्री. देसाई यांनी मागितलेली माहिती अतिव्याप्त व सरसकट स्वरूपाची आहे. अशी सरसंकट माहिती मागण्यापेक्षा नेमकी अशी विशिष्ट विभागातील माहिती त्यांनी मागितल्यास उत्तरातही नेमकेपणाचा अवलंब करणे अधिकाऱ्यांना आवश्यक ठरेल.

२. पाठविलेली माहिती न स्वीकारण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. पाठविलेली माहिती न स्वीकारता आपल्याला माहिती न मिळाल्याचा दावा अपीलकर्त्याने करणे योग्य नाही.

३. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अतिव्याप्त असली तरी जागेबाबतचा तपशील देवस्थान समितीकडे असणे आवश्यक आहे. सार्वजनिक हिताच्या व पारदर्शकतेच्या दृष्टीने असा तपशील अपीलकर्त्यानेच नव्हे, तर सर्वांनाच माहितीकरिता उपलब्ध असला पाहिजे. देवस्थान समितीने त्याबाबत कृती केलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ नुसार स्वेच्छेने जाहीर करावयाच्या माहितीतही याचा समावेश राहील.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलकर्त्याने माहिती मागून एक वर्षाचा कालावधी होऊन गेला आहे. सर्व माहिती उपलब्ध करून देण्यासाठी देवस्थान समितीला एवढा कालावधी भरपूर आहे. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती हा आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसात निःशुल्क द्यावी व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन रघुनाथ लोहार
१४४५, रोहीदास चौक, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २० / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोहन रघुनाथ लोहार
१४४५, रोहिदास चौक, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शरद गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एल.एस.पाच्छापुरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>१.सर्व शिक्षा अभियांनाअंतर्गत कागल तालुक्यातील शाळांना एकूण किती रुपये अनुदान वाटप झाले? कोणत्या शाळेला किती रुपये देण्यात आले?<br>२.सदर अनुदानाचा कोणत्या कारणासाठी वापर करणार याबाबत सर्व शाळांनी आपणाकडे कोणती कागदपत्रे सादर केली होती?<br>३.सदर अनुदानाचा त्याच कारणासाठी वापर करणेत आला काय? सदर अनुदानाचा अजूनही वापर झालेला नसेल तर तो का झालेला नाही?<br>४.सदर अनुदानातून शाळांनी कोणत्या प्रकारचे साहित्य, कॉम्प्युटर, तिजोरी अगर काय व कोणाकडून खरेदी केले? | |

## विवेचन

कागल, जिल्हा कोल्हापूर या जिल्ह्यातील शाळांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मिळालेले अनुदान, त्याचे वाटप, त्याचा वापर इ.बाबींची मागील १० वर्षांमधील माहिती अपीलकर्ता श्री.मोहन रघुनाथ लोहार यांनी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कागल यांच्याकडे मागितली होती. अपीलकर्ता दारिद्र्यरेषेखालील आहे की नाही याबाबतची निश्चिती न झाल्यामुळे, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर माहिती निःशुल्क दिली गेली नाही व ती पूर्ण व निःशुल्क मिळावी म्हणून श्री.लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.लोहार यांनी सुमारे १७२ शाळांची माहिती मागितली असून अशासकीय माध्यमिक शाळा, नगरपालिका व जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखालील शाळा यांचा त्यात समावेश आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी सन २००५ ते २००६ मधील माहिती दिली, परंतु १० वर्षांतील संपूर्ण माहिती मिळाली पाहिजे, तसेच अनुदानाचा योग्य वापर शाळा करतात की नाही याबाबत शाळांच्या

प्रमाणपत्राची तपासणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून केली जाते की नाही हे स्पष्ट करण्यात आलेले नाही, असे श्री.लोहार यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले. संपूर्ण माहिती द्यावयाची तर सुमारे २०,०००/- रुपये शुल्क भरावे लागेल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.लोहार यांना कळविले. आपण दारिद्र्यरेषेखालील असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सर्व माहिती नि:शुल्क मिळाली पाहिजे, अशी मागणी मात्र श्री.लोहार यांनी केली. दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला श्री.लोहार यांनी दिलेला नाही. मात्र त्याचा पुरावा म्हणून आपल्याकडील पिवळ्या शिधापत्रिकेची छायांकित प्रत जोडली आहे. परंतु 'शासन परिपत्रक अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.संकिर्ण १८९७/१९९४/प्र.क्रं./०६५/ना.पु.२८, दि.२१ नोव्हें.१९९८ मध्ये अंत्योदय अन्नयोजना लाभार्थीसाठीच्या या शिधापत्रिकेचा वापर फक्त शिधा वाटप दुकानातून शिधावस्तू उचलण्यासाठी करावयाचा असतो. अन्य कोणत्याही पुराव्यासाठी शिधापत्रिकेचा वापर करावयाचा नसतो, अशी तरतूद आहे '. असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी श्री.लोहार यांना कळविले. हा सर्व पत्रव्यवहार करतानाच श्री.लोहार यांचा दारिद्र्यरेषेखालील समावेश ग्राह्य मानण्याबाबत व नि:शुल्क माहिती द्यावयाची असल्यास छायांकनासाठी आवश्यक असलेली २०,०००/- रुपयाची तरतूद कशाप्रकारे करावी याबाबत शिक्षणाधिकारी कार्यालयाने प्रधान सचीव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय याच्याकडे मार्गदर्शन मागितले. ते प्राप्त झाल्यानंतर व अपेक्षित रकमेची तरतूद उपलब्ध झाल्यावर संबंधित माहिती नि:शुल्क देता येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कागल श्री.एल.एस.पाच्छापुरे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. यापूर्वी श्री.लोहार यांना तसे कळविले असल्याचेही त्यांनी कागदपत्रांसह माहिती नाकारलेली नाही, तर सातत्याने पत्रव्यवहार करुन त्याबाबतची संबंधित रकमेच्या तरतुदीबाबत वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला असल्याचेही श्री.पाच्छापुरे यांनी सांगितले. प्रक्रिया करण्यात आली आहे असेही प्रतिपादन त्यांनी केले. आपल्याला नि:शुल्क माहिती मिळाली पाहिजे व पिवळी शिधापत्रिका हा पुरावा ग्राह्य मानला पाहिजे, असे प्रतिपादन श्री.लोहार यांनी केले.

दारिद्र्यरेषेखालील समावेश व आर्थिक तरतूद असे दोन मुद्दे यात महत्त्वाचे असून त्याबाबत निर्णय झाल्यावर त्यानुसार त्वरित कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी व तोंडी मान्य केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची भूमिका माहिती नाकारण्याची नाही, असे दिसते. आर्थिक तरतूद व अन्य मार्गदर्शन त्वरित प्राप्त करुन घेऊन त्यांनी माहितीबाबत अपीलकर्त्याला योग्य तो प्रतिसाद देणे आवश्यक आहे. प्रत्येक संस्थेत स्वतंत्र जन माहिती अधिकारी असताना अपीलकर्त्यानेही एकाच कार्यालयाकडून सर्व माहितीचा आग्रह धरणे योग्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम अस्तित्वात आल्यानंतरच्या प्रारंभीच्या काळातील हे अपील असल्यामुळे उभय बाजूंकडून उणिवा राहणे स्वाभाविक आहे, ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) सामान्य प्रशासन विभागाचे सुस्पष्ट मार्गदर्शन व आवश्यक आर्थिक तरतूद याबाबतचा निर्णय हा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत करुन, त्यानुसार अपीलकर्त्यास माहितीबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी कळवावे व त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.५.५.२००८**